महाराष्ट्र लोकसेवा आयोग
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्र.वर्ग) मुख्य परीक्षा – २०१७
अंतिम निकाल

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे, **"दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्र.वर्ग) मुख्य परीक्षा – २०१७"** चा अंतिम निकाल दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी जाहीर केला आहे. प्रस्तुत परीक्षेत एकूण ५० उमेदवार यशस्वी ठरले असून सदर उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये ता. फलटण, जि. सातारा येथील **श्री.सोनवलकर अनिल साहेबराव** हे राज्यातून प्रथम आले असून ते मागासवर्गीय आहेत. तसेच, ता.जि.उस्मानाबाद येथील **श्रीमती तापडिया रूपाली सुरेश्चंद्रजी** या महिलांमधून प्रथम आल्या आहेत.

२. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्र.वर्ग) (पूर्व) परीक्षा – २०१७ दिनांक २१ मे, २०१७ रोजी मुंबईसह औरंगाबाद व नागपूर या तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. सदर परीक्षेस एकूण ७३५४ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे एकूण ८०३ उमेदवार मुख्य परीक्षा देण्याकरिता यशस्वी ठरले होते. मुख्य परीक्षा दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी मुंबईसह औरंगाबाद व नागपूर या तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. सदर मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे एकूण २३३ उमदेवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. उपरोक्त पदाच्या मुलाखती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ ते १६ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत घेऊन अंतिम निकाल दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

३. सदर निकालाआधारे ५० उमेदवारांची शिफारस शासनाकडे करण्यात येत आहे.

सु.सं.केसरकर
उपसचिव (परीक्षा-२)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई

मुंबई
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१८